महाराष्ट्र पोलीस
# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४६४ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ३० /०८/२०१८

## " आंबाडी येथे अवैध दारूचा पुरवठा करणारे वाहनासह दारूसाठा पकडला"

**पोलीस अधिक्षक यांचे जिल्हा रेड पथकाची कार्यवाही**

कारधा :–येथिल अवैध चिल्लर दारु विक्रत्यांना दारुसाठा पोहचविण्याकरीता आरोपी नामे महेंद्र श्रीराम साखरवाडे, वय ३० वर्ष रा. आंबाडी हा आपले मोपेड स्कुटी क्र. एम. एच. ३६यु ३७६१ गाडीनी आंबाडी येथे येत असल्याचे प्राप्त माहिती वरुन मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोउपनि जितेंद्र आडोळे यांचे सहकारी कर्मचारी व पोलीस स्टेशन कारधाचे कर्मचारी यांनी वाहन व अवैध दारुसाठा किंमती ५४,००० रुपयाचा माल पकडुन कार्यवाही केली.

दिनांक ३० ऑगस्ट २०१८ रोजी आंबाडी येथिल महेंद्र श्रीराम साखरवाडे हा मोहफुलाची हात भट्टी दारुने भरलेले रबरी टयुब आपले मोपेड स्कुटी क्र. एम. एच. ३६ यु ३७६१ मध्ये भरुन पालगाव कडुन आंबाडी येथे दारु विक्री करणारा इसम सकाळी ०९.३० वा. सुमारास पोहचवुन देणार असल्याची गुप्त बातमी मिळालेवरुन जिल्हा रेड पथकातील पोउपनि. जितेंन्द्र आडोळे यांनी आपले सहकारी कर्मचारी यांचेसह कारधा ते सिल्ली येथे नाकाबंदी करीत असता पालगाव कडुन आंबाडी येथे चौक कडे सदरचे वाहन क्र. एम. एच. ३६–२१२४ येत असतांना पाहुन त्यास थांबवुन दारुबंदी कायदया अंतर्गत वाहनाची पाहनी केली असता सदर वाहनाचे पायदान जवळ दोन रबरी टयुब मध्ये अंदाजे ४० लिटर मोहाफुलाची हात भट्टी दारु किंमती ४००० रुपयाची मिळुन आली.तसेच एक पांढऱ्या रंगाची स्कुटी क्र. एम. एच. ३६ यु ३७६१ वापरती होंडा कंपनीची अंदाजे किंमती ५०,००० रुपयाची असा एकुण ५४,०००रुपयाचा माल वाहतुक करतांना मिळुन आल्याने पंचा समक्ष योग्य कार्यवाही करुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे कारधा येथे कलम ६५ (अ) महा. दारुबंदी कायदया अन्वये कार्यवाही करुन अटक करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक, श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक जितेंद्र आडोळे, सहा. फौजदार अश्विनकुमार मेहर, पोलीस हवालदार रुपचंद जांगळे, पोलीस हवालदार मनगटे, पोलीस नाईक प्रदिप डाहारे, विनोद शिवनकर, सचिन गाढवे, काचगुंडे यांनी केली आहे.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.